नियमित फौजदारी खटला क्र.८०/२०२०.
सरकार/राहुल
नि.क्र.१६

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.३ याची साक्ष –</u>**

**मी शपथेवर सांगतो कि,**

| | | |
|---|---|---|
| **नाव** | **–** | **भुजंग वसंतराव बन्सोड** |
| **वय** | **–** | **३९ वर्ष** |
| **धंदा** | **–** | **पोलीस हवालदार, पोलीस ठाणे नरखेड** |
| **राहणार–** | | **नरखेड, ता.नरखेड, जि.नागपूर** |

**<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कु.एस.एस.गंगावणे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. दिनांक १०.०१.२०२० रोजी मी पोलीस स्टेशन नरखेड येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. पोलीस शिपाई मनोज गाढवे यांनी रेड करुन आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ अंतर्गत गुन्हा नोंद करुन सदर प्रकरणाची केस डायरी चौकशी कामी मला दिली होती.

२. मी सदर प्रकरणात साक्षिदारांचे बयाण त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. पोलीस शिपाई मनोज गाढवे यांनी वैद्यकीय प्रयोगशाळा, नागपूर येथे सदर प्रकरणातील जप्त केलेल्या दारुपैकी जप्त केलेला नमुना रासायनिक तपासणीसाठी पाठविला होता. सदर रासायनिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो अभिलेखावर दाखल केला आहे. साक्षिदार सदर रासायनिक अहवाल बघुन सांगतो कि सदर अहवाल या प्रकरणात जप्त केलेल्या दारुचाच आहे. करिता सदर रासायनिक अहवालला **नि.क्र.१७** देण्यात येते. चौकशीअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने मी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. साक्षिदाराने न्यायालयात हजर असलेल्या आरोपीकडे बघुन त्याला ओळखले.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री.पी.डी.वाढीवे मार्फत.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे कि आम्ही जेव्हा जुगार अथवा दारु कामी रेड टाकायला जातो तेव्हा त्याबाबतची नोंद स्टेशन डायरी मध्ये करत असतो. हे म्हणणे

खरे आहे कि सदर प्रकरणात रेड टाकणारे तसेच फिर्यादी व मौका व जप्ती पंचनामा तयार करणारे पोलीस हवालदार मनोज गाढवे हेच आहेत. हे म्हणणे खरे नाही कि आम्हाला आमच्या वरिष्ठांच्या निर्देशांप्रमाणे केसेसची पुर्तता करायची असल्याने सदरचे खोटे दोषारोपपत्र मी दाखल केले. हे म्हणणे खरे नाही कि आरोपीच्या ताब्यातुन कधीही दारु जप्त करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही कि नि.क्र.१७ च्या रासायनिक अहवालामधील नमुना आम्ही कधीही आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही कि मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही कि मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**फेरतपास काही नाही**

| | |
|---|---|
| **श्रवणोत्तर स्विकृत** | **समक्ष** |
| **(पी.आर.पाटील)**<br>**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**<br>**नरखेड** | **(पी.आर.पाटील)**<br>**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**<br>**नरखेड** |

**दिनांक – ०५.०७.२०२४**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतिप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव– अ.य.कुळकर्णी**